# People of Dhule Appreciated work of Dhule Police.

People of Dhule appreciated Dhule District Police work for keeping law and order during important festivals.

## जयश्री कृष्ण सांस्कृतिक मंडळातर्फे पोलिस अधीक्षक साहेबराव पाटील यांच्यासह पोलिस प्रशासनातील अधिकाऱ्यांचा सत्कार



धुळे – जिल्हयात नुकताच गणेशोत्सव व बकरी ईद हे दोघे सण उत्साहात भावपुर्ण विविध उपक्रम कार्यक्रमांनी जिल्हाभर साजरे करण्यात आले.

कोणताही सण उत्सव साजरा करतांना शांततेत व कायदा सुव्यवस्था अबाधीत राहणेच्या दृष्टी कोनातुन पोलिस प्रशासन प्रशासकीय पातळीवर विविध सामाजिक संघटना यांना सोबत घेवुन समाजात एकतेचा संदेश देण्यासाठी सदैव प्रयत्नशील असते.

जिल्हा पोलिस प्रशासनाच्या कर्तव्यदक्ष कारभारामुळे जिल्हयात गणेशोत्सव्र व बकरी ईद हे सण सर्वत्र शांततेत पार पडले.

पोलिस प्रशासनाच्या अथक परिश्रमाच जणु त्यांच्या कार्याची ही चांगली पावती म्हणावी लागेल उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रशासनाचा गुणगौरव करणे हे आपले आद्य कर्तव्य समजुन पोलिस प्रशासनाला त्यांच्या कार्यास स्फुर्ती, प्रेरणा मिळावी या उदात्त हेतुने जय श्रीकृष्ण सांस्कृतिक, शैक्षणिक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मा. नगरसेवक भिकन आप्पा वराडे यांनी दि.३ ऑक्टोबर २०१५ रोजी जिल्हा पोलिस अधीक्षक साहेबराव पाटील अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांतजी गवळी, उपविभागीय पोलिस अधिकारी हिम्मत राव जाधव, एल. सी. बी. चे पी. आय. देवीदास शेळके यांचा नुकताच मंडळातर्फे सत्कार करण्यात आला. कायदा व्यवस्था अबाधीत राहण्यासाठी जिल्हा पोलिस प्रशासनाला आझाद नगरचे पोलिस निरीक्षक रमेश सिंह परदेशी, शहर पोलिस ठाण्याचे अनिल वडनेरे, देवपुर चे पी. आय. देवीदास भोज, मोहाडी पोलिस स्टेशनचे पी. आय. थोरात साहेब, शहर वाहतुक शाखेचे पी.आय.पाटील साहेब, पवार साहेब तसेच देवपुर पश्चिम विभागाची पी.आय.श्री.पाटील साहेब आदींच्या अनमोल सहकार्याने गणेशोत्सव व बकरी ईद सण उत्साहात साजरे करण्यात आले.

या सर्व अधिकाऱ्यांचे गुणगौरव व आभार मंडळातर्फे आभार मानले आहे.

या कार्यक्रमाप्रसंगी मगन पाटील, मिलींद धात्रक, भिमा शर्मा, राजेंद्र पालवे, पंकज बागुल, सतिष वाघुले, पांडुरंग ठाकुर, विनोद चव्हाण, शंकर पवार, नितीन वानखेडकर यांच्यासह मंडळाचे अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

## ताण-तणाव निवळला; नि:श्वास सुटला, धुळे जिल्हा पोलिस दलाचे जाहीर आभार!

धुळे । प्रतिनिधी

जिल्हा पोलिस दलाने व विविध शासकीय यंत्रणांनी महिनाभराचा ताण-तणाव निवळल्याने खरोखरच सुटकेचा नि:श्वास टाकला आहे. गेल्या महिनाभरापासून सण-समारंभ-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर पोलिस दलावर मोठा ताण पडला होता. तशातच धुळे शहर संवेदनशील ठरल्याने कायदा व सुव्यवस्थेचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. मुस्लीम बांधवांची बकरी ईद आणि हिंदू धर्मीयांचा गणेशोत्सव लागोपाठ आल्याने परिस्थितीला कोणतेही गालबोट लागू नये, कुठे काही गैरप्रकार घडू नये म्हणून पोलिस व निमलष्करी दले डोळ्यात तेल घालून रात्रंदिन



सतर्क राहिले होते. त्यातल्या त्यात गणेशोत्सवाचा प्रथम दिन व अखेरचा दिवस मोठमोठ्या मिरवणुकांनी गाजल्याने बंदोबस्त कडक करण्यात आला होता. बकरी ईदसुद्धा मोठ्या उत्साहाने पार पडली. गणेशोत्सव व बकरी ईद सुस्थितीत पार पडावे, कुठलाही गालबोट लागू नये यासाठी धुळ्याचे जिल्हाधिकारी अण्णासाहेब मिसाळ, जिल्हा पोलिस प्रमुख साहेबराव पाटील, अप्पर पोलिस अधीक्षक चंद्रकांत गवळी, डी.वाय.एस.पी. हिंमतराव जाधव, शहर पोलिस निरीक्षक अनिल वडनेरे, आझादनगरचे रमेशसिंग परदेशी, देवपूरचे पीआय देविदास भोज, तालुका पोलिस ठाण्याचे रमेश मुंढे, मोहाडीचे पोनि विकास थोरात आदी अधिकाऱ्यांनी व त्यांच्या पोलिस कर्मचाऱ्यांनी उत्तम भूमिका पार पाडली. त्याबाबत श्री द्वारकाधीश प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा परमगोभक्त रवींद्रबापूजी शेलार यांनी जिल्हा पोलिस दलाचे व अधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत.